# गुटखा तस्करी करणारे वाहन पकडले!

## दोघांना अटक, बोलेरो वाहनासह 12 लाखांचा माल जप्त



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.5 )-** बोलेरो वाहनाने गुटख्याची तस्करी करणाऱ्या दोन जणांना गुन्हे शाखेच्या पोलिसांनी 5 जानेवारी रोजी राजापेठ हद्दीतील साईनगर मार्गावर अटक केली. सुरज हरीकिशोर लाहोटी (38, रा. रवीनगर अमरावती) व भुषण किशोरराव बुब (31, रा. रिंग रोड, वरूड, जिल्हा अमरावती) यांचा आरोपींमध्ये समावेश असून, त्यांच्याजवळील गुटखा आणि वाहन असा एकुण 12 लाख 5 हजार 396 रूपये किमंतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

5 जानेवारी रोजी गुन्हे शाखा युनीट क्रमांक 1 चे पोलीस पथक राजापेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलींग करत असताना, त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम पांढ्या रंगाच्या बोलेरो गाडीमध्ये साईनगर मार्गाने रवी नगराकडे गुटख्याची वाहतूक करत आहे. सदर माहीतीवरून पोलिसांनी अन्न व औषधी प्रशासन विभागाच्या अधिकारी यांच्याशी संपर्क करून त्यांच्यासह साईनगर भागात पाळत ठेवली. दरम्यान एक बोलेरो पिकअप वाहन हे साई हेरिटेज, मालू ले आऊटजवळील साईनगर परिसरामध्ये दिसून आले. पोलिसांनी बोलेरो वाहन क्रमांक एम.एच.27 डि.एल 2298 ची तपासणी केली केली असता त्यामध्ये प्रीमीयम रजनीगंधा पानमसाला, पानबहार पानमसाला, प्रिमीयम पानपराग पानमसाला, हॉट प्रिमियम पानमसाला, विमल पानमसाला, ए वन सुगंधीत तंबाखू, एच-5 सुगंधीत तंबाखू असा विवीध ब्रॅन्डचा माल आढळून आला. त्यामुळे पोलिसांनी 2 लाख 5 हजार 396 रुपयांचा माल व 10 लाख रुपये किमंतीचे वाहन असा एकुण 12 लाख 5 हजार 396 रुपयांचा माल जप्त केला.

### प्रकरण एफडीए कडे हस्तांतरीत

यांप्रकरणात पोलिसांनी सुरज हरीकिशोर लाहोटी व भुषण किशोरराव बुब याना ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील कारवाई अन्न व औषधी प्रशासनाच्या (एफडीए) विभागाने केली. यांप्रकरणात अन्न सुरक्षा अधिकारी घनश्याम पंजाबराव दंदे यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्हाचा पुढील तपास सुरू आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचन्द्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, गणेश शिंदे, सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, जयदत्त भवंर यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट क्रमांक 1 चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, पोलिस उपनिरीक्षक प्रकाश झोपाटे, पोलिस हवालदार फिरोज खॉन, सतिश देशमूख, सचीन बहाळे, अलीमउददीन खतीब, पोलीस अमंलदार नाझिमउददीन सैय्यद, विकास गुडदे, सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक रोशन माहुरे, किशोर खेंगरे यानी केलेली आहे.

# रात्रीच्या तापमानात दोन ते तीन अंशाने वाढ



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.5 )-** हिवाळा संपत आला असताना, उन्हाळ्यातील चटक उन्हाची चाहूल आता लागलेली आहे. त्यामुळे थंडीचा प्रभाव हळूहळु कमी होऊ लागला आहे. रविवारी अमरावती जिल्ह्यातील किमान तापमानात 11.9 डीग्री सेल्सीअसची नोंद घेण्यात आली असून, कमाल तापमान 31.4 डीग्री सेल्सीअवर गेले आहे. आता पुढील तीन दिवस किमान तापमान हे दोन ते तीन डीग्रीने वाढण्याची शक्यता आहे. अशी माहिती हवामान तज्ज्ञाने दिली.

पश्चिम हिमालयीन पश्चिमी विक्षोभाच्या प्रभावामुळे नैरूत्य राजस्थानवर हवेच्या खालच्या थरात चक्राकार वारे वाहत आहेत. विदर्भात अंशत: ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. या स्थितीमुळे पुढील तीन दिवसात विदर्भात रात्रीच्या तापमानात 2 ते 3 डीग्री सेल्सीअसने वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील तीन दिवसात किमान तापमान 14 ते 15 डीग्री सेल्सिअसपर्यंत जाऊ शकते. 9 जानेवारीपासून पुन्हा रात्रीचे तापमान घसरण्याची शक्यता आहे. तसेच कमाल तापमान 32 ते 33 डीग्री सेल्सीअसपर्यंत राहु शकते. पुढील आठवडाभर पावसाची शक्यता नाही, अशी माहिती हवामान तज्ज्ञ प्रा. अनिल म. बंड यांनी दिली.




अमरावती-आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तबलावादक उस्ताद जाकीर हुसेन यांना अमरावतीकरांकडून श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी 21 तबलवादकांच्या सांघिक तबलावादनाचा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रविवार 5 जानेवारी 2025 रोजी सायंकाळी 7 वाजता अमरावतीच्या संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक नाट्यगृहात या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विदर्भातील ख्यातनाम कलावंतांनी या कार्यक्रमात भाग घेतला होता. यावेळी माजी आमदार प्रवीण पोटे, राष्ट्रवादीचे नेते संजय खोडके, आयोजक शिवराय कुलकर्णी, जयंत डेहनकर, प्रशांत देशपांडे उपस्थित होते.( छायाचित्र-मनिष जगताप )

### दोन अल्पवयीन मुलींना पळविले

अमरावती- ग्रामिण हद्दीतील परतवाडा आणि दत्तापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून प्रत्येकी एक अशा दोन मुलींना अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेले. या घटनेच्या तक्रारीवरून परतवाडा आणि दत्तापूर पोलिसांनी अज्ञाताविरुध्द अपहरणाच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

# ट्रकच्या धडकेत क्लिनरचा मृत्यू

## नागपूर ते तिवसा मार्गावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.5 )-** भरधाव ट्रकने रस्त्यावर उभ्या असणाऱ्या दुसऱ्या ट्रकला धडक दिल्याने क्लिनरला मृत्यू झाला. विपीन संतोषकुमार (27, रा. हरचंदपूर निस्वारपूर, जालौन, उत्तरप्रदेश) असे मृताचे नाव आहे. तर ट्रक चालकही जखमी झाला. ही घटना नागपुरी ते तिवसा रोडवरील समर्थ हॉटेलसमोरील रस्त्यावर घडली. या घटनेची तक्रार चालक अनिल खान जुल्फ खान (44, रा.कादरीपुरा, आकोट फाईल, अकोला) यांनी 4 जानेवारी रोजी तिवसा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी सुमित रामनारायण कुमार (23) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

अनिस खान हे ट्रक क्रमांक एमएच 21 बीएच 7787 ने नागपुर ते तिवसा रोडवरून जात होते. दरम्यान ट्रक क्रमांक एचआर 55 एयु 6554 च्या चालकाने आपला ट्रक भरधाव निष्काळजीपणाने चालवून अनिल खान यांच्या ट्रकला उजव्या बाजुस धडकला. त्यामुळे या अपघातात ट्रकमधील क्लिनर विपीन संतोष कुमार याचा मृत्यू झाला, तर ट्रक चालक सुमित कुमार हा सुध्दा जखमी झाला. अशा आशयाची तक्रार अनिस खान याने तिवसा पोलिसात नोंदविली आहे.

# गोकुल कॉलनीत घरफोडी

## 50 हजाराचा मुद्देमाल लंपास

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.5 )-** राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एकविरा नगर स्थित गोकुल कॉलनीत घरफोडी झाली. 4 जानेवारी रोजी या घटनेची तक्रार भास्करराव किसनराव हागे (73, रा. गोकुल कॉलनी, एकविरानगर, अमरावती) यानी राजापेठ पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. भास्करराव हागे यांनी एमएच 27 एएच 7562 या क्रमांकाची दुचाकी घराच्या मागील भागात उभी केली होती. त्यानंतर ते नेहमीप्रमाणे घराची दारे बंद करून रात्रीच्या वेळी झोपले. दुसर्या दिवशी सकाळी 7 वाजता ते झोपेतून उठल्यानंतर त्यांना घराचे मुख्य दार उघडे दिसले तसेच घराच्या आवारातील दुचाकी दिसली नाही. त्यामुळे त्यांनी घरातील बेडरूममध्ये जाऊन पाहिले असता, घरातील साहित्य अस्तव्यस्त दिसले. त्यामुळे आपल्या घरी चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी घरातील साहित्यांची पाहणी केली असता, चोराने घरातून 10 हजाराची रोख व दुचाकी असा एकुण 50 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल चोरून नेल्याचे आढळून आले. त्यामुळे भास्करराव हागे यांनी तत्काळ राजापेठ पोलिस ठाण्यात जाऊन या घटनेची तक्रार दिली.

# संगीत हे सर्वात मोठे औषध आहे-आमदार रवी राणा

## 400 तासाच्या वर्ल्ड रेकॉर्ड कार्यक्रमाचा श्रीगणेशा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.5 )-** संगीत असे आहे की, माणसाला कितीही मोठे टेंशन असले तरी आपण संगीतात रमलो असताना आपल्यावर आलेले टेन्शन आपणास अजिबात माहिती पडू देत नाही. संगीतामुळे आपला तणाव नाहीसा होतो, त्यामूळे आपल्यावर आलेल्या तणावांमध्ये आपण स्वत: संगीतात रमून गाणे गात जावे, म्हणजे कोणतेही टेन्शन आपल्याला येणार नाही. असे प्रतिपादन आमदार रवी राणा यांनी केले. शनिवारी(दि.4) येथील अभियंता भवनमध्ये स्वराज्या एंटरटेनमेंट व मनीष पाटील फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत 400 तासाच्या कॉल रेकॉर्ड कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते.

आ.राणा पुढे म्हणाले की, वर्ल्ड रेकॉर्डची संकल्पना नागपूर वरून अमरावतीला घेऊन येणारे मनीष पाटील माझे चांगले मित्र आहेत. आज अमरावती येथील स्वराज्य संचालक दिनकर तायडे व स्वामिनी तायडे यांनी 18 दिवस वर्ल्ड रेकॉर्डचा कार्यक्रम घेवून खूप मोठे धाडस केले आहे. अमरावतीमध्ये हा कार्यक्रम पहिल्यांदाच होत आहे. आधी आपल्याला आपले गाणे शूट करायचे असल्यास आपल्याला पुणे किंवा मुंबईला जावे लागत होते. मात्र आता आपल्याला आपल्या शहरातच ही सुविधा यांनी उपलब्ध करुन दिले आहे. आधी जास्तीत जास्त लोक बाथरूम सिंगर असे संबोधीला जात होते, परंतू मनीष पाटील तसेच चंद्रकांत भाऊ यांच्यासारख्या लोकांनी अमरावती येथील कलाकारांना एक मंच उपस्थित करून कराओकेच्या माध्यमातून शहरात वीस ते 22 स्टुडिओ स्थापन केले आहे. कलाकारांनी या कार्यक्रमाशी जूळून या लोकांचा उत्साह व्दिगुणित केला आहे. सांस्कृतिक भवन सारखा मोठा स्टुडिओ आपल्या अमरावतीमध्ये झाला पाहिजे.

त्याकरिता सरकारी निधी कसा मिळेल, त्यासाठी आमचा पुरेपूर प्रयत्न राहील असे आश्वासनही यावेळी आ.राणा यांनी दिले. . या वर्ल्ड रेकॉर्ड ची सुरुवात ठीक 8 वाजता सुरू करण्यात आली. 18 दिवस 18 रात्र हा 40 6 तासाचा वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये सुरुवात यांनी गारवा मधील गीत गाऊन सर्वांना आनंदित केले. त्यानंतर मयूर प्रेम रोगी यानंतर एकापेक्षा एक गीत सादर केले. हा मल्टी टॅलेंटेड रेकॉर्ड राहील यामध्ये चार घंट्या नंतर वीस मिनिटांचा ब्रेक दिला जातो. हा वर्ल्ड रेकॉर्ड 21 जानेवारीला दुपारी तीन वाजता समाप्त होईल.

### अमरावतीमध्ये प्रथमच आयोजन

अमरावतीत प्रथमच अठरा दिवस व 18 रात्र असा 400 तासाचा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या अमरावतीमध्ये बनत आहे. सर्वप्रथम सरस्वती मातेचे पूजन करून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर स्वराज्य एंटरटेनमेंट चे स्वामिनी यांची मुलगी स्वराध्या हिने ‘ तू बुद्धि दे, तू तेज दे नव चेतना विश्वास दे, हे गाणे गाऊन कार्यक्रमाला सुरुवात केली. यानंतर स्वराज संचालक दिनकर जाडे यांनी ‘जय हनुमान ज्ञान गुण सागर’ हा हनुमान चालीसा गाऊन कार्यक्रमाला चांगलीच रंगत आणली. कार्यक्रमाची प्रास्ताविक स्वराध्या इंटरटेनमेंटच्या संचालिका स्वामिनी दिनकर तायडे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये स्वराज्या एंटरटेनमेंट ची सुरुवात अमरावतीला 2017 पासून सुरू झाली. त्यानंतर नवोदित कलाकारांना सोबत घेऊन त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले.

### गुजरात चा रेकॉर्ड तोडला

मनीष पाटील यांनी सांगितले, की 31 ऑगस्ट ला नागपूर येथे 180 घंट्याचा वर्ल्ड रेकॉर्ड कार्यक्रम आम्ही आयोजित केला होता ‘हुनर की तलाश’ या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जेव्हा गुजरातचे मुख्यमंत्री होते, त्यांचे द्वारा आयोजित 62 घंट्याचा लाईव्ह आर्केस्ट्रा हा रेकॉर्ड तोडला होता. हेही यावेळी बोलताना सांगितले या कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. ईशांत राजगुरे यांनी केले.




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# पहाटे गारठा, दुपारी चटका!


## एकाच दिवसात हिवाळा आणि उन्हाळ्याचा अनुभव


**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट,( दि.5 )** - तापमानात कमालीचा बदल झालेला आढळत आहे. हिवाळा आणि उन्हाळा एकाच दिवसात नागरिक अनुभवत आहे. सकाळी रात्री कमालीची थंडी तर दिवसा कडक उन्हाचा चटका असे वातावरण सध्या जाणवत आहे.

तापमानात अनेक चढ उतार पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी राज्यात पाऊस आणि थंडी असे वातावरण होते. त्यानंतर राज्यातून पाऊस आणि थंडी काही दिवसांसाठी गायब झाली होती. दरम्यान, गायब झालेली थंडीचे पुनरागमन झालं असून आता थंडी सह उष्णता देखील वाढली आहे. राज्यात सकाळी आणि रात्री थंडी तर दुपारी उष्णतेचा अनुभव नागरिक घेत आहे. पुढील काही दिवस राज्यात असेच वातावरण राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

वेध शाळेने दिलेल्या माहितीनुसार राज्यात पुढील काही दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. तर किमान तापमानात पुढील दोन ते तीन दिवस फारसा बदल होणार नाही.

आकाश मुख्यत: निरभ्र राहण्याची शक्यता आहे. तर पहाटे धुके पडण्याची शक्यता आहे. तीन ते चार दिवस आकाश मुख्यत: निरभ्र राहून दुपारी किंवा संध्याकाळी आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. सकाळी धुके पडण्याची शक्यता आहे. पुढील तीन ते चार दिवस किमान तापमानात दोन ते तीन डिग्री सेल्सियसने वाढण्याची शक्यता आहे. राज्यात उत्तरेकडील वाऱ्यामुळे गारठा वाढायला सुरुवात झाली आहे. उत्तरेतील अनेक राज्यांमध्ये थंडीचा कडाका वाढला असून कोरड्या वाऱ्यांचे प्रवाह सक्रीय झाले आहे. हे कोरडे वारे राज्याच्या दिशेनेही वाहत असून यामुळे आकाश निरभ्र राहून सकाळी गारठा व दुपारी उन्हाचा चटका जाणवत आहे.





# ओ भाऊ, अहो दादा, कर्कश हॉर्न वाजवू नका!

## रस्ता सुरक्षा अभियानात वाहन चालकांचे प्रबोधन






**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.5 )** - ओ भाऊ, अहो दादा, कर्कश हॉर्न वाजवू नका हो! असे म्हणत रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत आज दि. 5 जानेवारी रोजी नो हॉर्न , कर्कश आवाज करणाऱ्या वाहन चालकांचे जनजागृती मोहीम व प्रबोधन करण्यात आले. वाहनाच्या कर्कश आवाजामुळे पादचारी तसेच वाहन चालक यांना कर्कश आवाजाचा प्रचंड मोठ्या प्रमाणात त्रास होतो. तसेच यामुळे भ्रमण वायू प्रदूषण सुद्धा निर्माण होऊ शकते, या बाबतची जनजागृती प्रादेशिक परिवहन कार्यालय अमरावतीच्या माध्यमातून प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक मोटर वाहन निरीक्षक सतीश राठोड, गणेश शिरगिरे, सिद्धांत दहीकर, शोएब शेख , कृष्णा नेवरे, जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर , वाहन चालक बलराज बोंडवले, जीवन मनोहर आदींनी आज शहरांमध्ये चौका-चौकात कर्कश वाहन बाबत जनजागृती केली.

# रात्रीच्या अंधारात शहानुर नदीपात्रात नागपूर पोलिसांचा तपास

## घटनास्थळी बघ्यांची गर्दी



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.5 )** - नागपूर पोलिसांचा अंजनगाव सुर्जीतील शहानुर नदीत सुरू असलेल्या तपासाने येथील हजारो नागरिकांना संभ्रमात टाकल्याने शहरात वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले आहे.

याबाबत माहिती अशी की, नागपूर येथील एका मोठ्या घटनेतील तपासात गेल्या दोन-तीन दिवसापासून नागपूर पोलीसांचे एक पथक अंजनगाव सुर्जी येथील शहानुर नदीत रात्रीच्या अंधारात काही शोधत असल्याची वार्ता शहरात पसरली आणि त्यामुळे दि.4 जानेवारी रोजी रात्री सुर्जीत जाणाऱ्या पुलावर शहानूर नदीपात्रात अंधारात पोलिसांच्या तपास मोहिमेची गंमत पाहण्याकरिता बघ्यांनी प्रचंड गर्दी झाली होती. परंतु नागपूरचे प्रकरण नेमके काय ? पोलीस अंधारात काय शोधत आहे? असा प्रश्न नागरिक एकमेकांना विचारित होते. नागपूर पोलीसही माहिती लपवित असल्याने शहरात वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले आहे. याबाबतची माहिती सुद्धा अंजनगाव सुर्जी पोलिसांना देण्यात आली नसल्याचे समजते. याबाबत स्थानिक प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी नागपूर येथील तपास पोलीस पथकाला विचारणा केली असता पोलीस अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली.

अंजनगाव पोलीस स्टेशनला या आम्ही माहिती देतो अशी वेळ मारून पोलीस पथक रवाना झाले. शहानूर नदीतील पात्रातील एका डबक्यातून चाकू सारखे धारदार शस्त्र नागपूर पोलिसांनी जप्त केल्याचे समजते. या घटनेच्या निमित्ताने नागपूर येथील तपास पोलीस अधिकाऱ्याच्या काम करण्याच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून रात्रीच्या अंधारात शहानुर नदीपात्रात तपास मोहीम करता ती दिवसा का करण्यात आली नाही. असा प्रश्न नागरिकात केल्या जात आहे. या प्रकरणाबाबत स्थानिक ठाणेदारांना पत्रकारांनी विचारणा केली असता सदर चे पोलीस तपासासाठी अंजनगाव सुर्जीत आले असताना आम्हाला जी सहायता मागितली त्याप्रमाणे आम्ही त्यांना सहायता पुरवली, त्यामुळे आपण सदर माहिती संबंधित पोलीस नागपूर यांच्याशी संपर्क साधून करावा असे आणि ठाणेदार प्रकाश अहिरे यांनी सांगितले.

# शांती निकेतन शाळेतील स्नेहसंमेलनाचा आनंदोत्सव



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.5 )**- येथील शांतिनिकेतन शाळेमध्ये दोन दिवसीय शालेय स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहात आणि आनंददायी वातावरणात पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलिस उपनिरीक्षक नितीन देशमुख, एसटी डेपो मॅनेजर आशा वासनिक, राजेश पाटील, अंबादास सिनकर, संस्थेचे अध्यक्ष दिलीप अग्रवाल, सचिव नारायण असलकर, कोषाध्यक्ष दिलीप देशमुख, शाळेचे मुख्याध्यापक अमोल चौधरी, पर्यवेक्षिका प्रिती राऊतकर, ज्योती लाडविकर, अर्चना पवार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभात शाळेतील सर्व बस चालकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर सत्र 2023-24 मध्ये दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा, तसेच विविध तालुकास्तरीय स्पर्धांमध्ये चित्रकला, स्कॉलरशिप, नवोदय, क्रीडा स्पर्धा ङ्क सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह आणि रोख पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध नृत्य कला सादर करून सर्व उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. पालकांसाठी विविध आनंदोत्सव कार्यक्रमांचे आयोजन केले गेले होते, ज्यामध्ये 'फोटो कॉंटेस्ट', 'फॅन्सी ड्रेस कॉम्पिटिशन' आणि 'पेरेंट्स डान्स' यांचा समावेश होता.

तत्पूर्वी, वर्षभरातील विविध स्पर्धांसाठी बक्षिस वितरणाचे आयोजन करण्यात आले. अखेरीस, सर्व विद्यार्थ्यांना आणि पालकांना स्नेहभोजनाचा समारंभ घेण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक अमोल चौधरी, पर्यवेक्षिका प्रिती राऊतकर, तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# अनाथांची माय सिंधुताई सपकाळ यांची पुण्यतिथी

## मान्यवरांकडून मौन श्रद्धांजली



### आईनी संघर्ष करायला शिकविले!

आईने संघर्ष करायला शिकवले आहे. त्यांच्या पावलावर पाऊल टाकून त्यांचा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहोत, तसेच यापुढेही आपण आईचे काम पुढे नेण्यासाठी प्रयत्न करू, आईने अनाथ मुलांचा शिक्षणासाठी जो प्रयत्न केला. त्यांनी केलेल्या कामाला पुढे नेण्यासाठी आपण प्रयत्न करू असे अरुण सपकाळ माईनचे सुपुत्र यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले. आपल्या भावना व्यक्त करताना ते गहिवरून आले.

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी( दि.5 )** - प्रख्यात समाजसेविका व अनाथांची माय पद्मश्री सिंधुताई सपकाळ तसेच यांची तृतीय पुण्यतिथी चिखलदऱ्यात त्यांनी उभारलेल्या आश्रम शाळेत साजरी करण्यात आली. याप्रसंगी मेळघाट चे आमदार केवलराम काळे, दर्यापूरचे आमदार गजानन लवटे, मेळघाट चे माजी आमदार प्रभुदास भिलावेकर, सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी टी.एस.भाल, गवळी समाज संघटनेचे अध्यक्ष सदाशिव खडके, पद्मश्री सिंधुताई सपकाळ यांचे सुपुत्र अरुण सपकाळ इत्यादी प्रामुख्याने या प्रसंगी उपस्थित होते तसेच पद्मश्री सिंधुताई सपकाळ यांनी स्थापन केलेले मुलींसाठी स्थापन केलेल्या सावित्रीबाई फुले वस्तीगृहाची मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भागातील शेकडो नागरिक सुद्धा या प्रसंगी उपस्थित होते. प्रामुख्याने उपस्थित असलेले आयपीएस अधिकारी टी.एस.भाल यांनी सांगितले की पद्मश्री सिंधुताई सपकाळ यांनी समाज सेवेची सुरुवात मेळघाटातून केली. या भागातील गवळी बांधव व वन विभागामध्ये मोठ्या प्रमाणात संघर्ष झाला होता. वैराट व चुरणी या दोन गावांचा वन विभागाची संघर्ष झाला होता. त्या काळात माईनी या भागातील स्थानिकांची बाजू घेऊन प्रशासनाची संघर्ष उभा केला होता. खऱ्या अर्थाने तेव्हा पासूनच माईनी सामान्य जनतेसाठी लढायला सुरुवात केली होती. या भागातील जनतेला न्याय देण्यासाठी त्यांनी खूप संघर्ष केले आणि पुढे त्या बाराशे अनाथ मुलांच्या आई झाल्या. त्या काळात ते अमरावती जिल्ह्याचे एसपी होते. त्यानंतर मेळघाटचे आमदार काळे बोलताना म्हणाले की, पद्मश्री सिंधुताई सपकाळ यांचे कार्य महान आहे. त्यांनी अनाथांसाठी मोठे कार्य केले आहे. तसेच मेळघाटातील जनतेसाठी सुद्धा त्यांनी अतुलनीय कार्य केले आहे. त्यांचा वारसा त्यांचे पुत्र चालवत आहेत. येणाऱ्या काळात अरुण सपकाळ यांना कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास त्यांनी दिलखुलास पणे सांगावे आपण त्यांना मदत करू, त्यांच्या समाजसेवेच्या कामांमध्ये आपण त्यांच्या पाठीशी नेहमी उभे राहू अशी हमी दिली तसेच याप्रसंगी सर्वांनीच आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मोठ्या संख्येने नागरिक श्रद्धांजली देण्यासाठी उपस्थिती होते.

# ट्रान्सफार्मरमधून ऑईल चोरी

**अमरावती** - भातकुली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पेढी स्थित रामेश्वर टाले यांच्या शेतशिवारातील ट्रान्सफार्मरमधून अज्ञात चोराने 350 लीटर ऑईल चोरी केले. या ऑईलची कीमंत 26 हजार रुपये होती. सहायक अभियंता अमोल बोंडे यांच्या तक्रारीवरून 3 जानेवारी रोजी भातकुली पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.



# नालीत पडल्याने इसमाचा मृत्यू

**अमरावती** - भरधाव दुचाकी निष्काळजीपणाने चालवून नालीत पडल्याने एका इसमाचा मृत्यू झाला. प्रमोद दौलतराव भेडे (55, रा. निमसवाडा) असे मृताचे नाव आहे. या घटनेची फिर्याद लोणी पोलिस ठाण्यातील एएसआय राजेश उमक यांनी 3 जानेवारी रोजी लोणी पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी मृताविरुध्द गुन्हा नोंदविला.

# जनता विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी,( दि.5 )**- जनता विद्यालय येथे शुक्रवार (3 जानेवारी 2025) रोजी सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष विनोद मुगल हे होते. प्रमुख अतिथी धनंजय वानखडे गटशिक्षण अधिकारी जिल्हा परिषद पंचायत समिती, अमरावती तसेच अजित पाटील विस्तार अधिकारी,अमरावती हे होते. सर्वप्रथम उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुलेच्या प्रतिमेचे पूजन आणि हारार्पण करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष व उपस्थित प्रमुख अतिथींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद चिंचोळकर यांनी केले. त्यानंतर विद्यार्थ्यांची भाषणे झाली. काही विद्यार्थिनी सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत आलेल्या होत्या. त्यांनी त्यांच्याच शब्दांमध्ये सावित्रीबाईंच्या जीवनकार्याच स्मरण करून दिले. त्यानंतर पर्यवेक्षक गजेंद्र अवघड, ज्येष्ठ शिक्षिका वैशाली ठाकरे, अर्चना पोकळे यांनी सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या कार्याविषयीची माहिती विद्यार्थ्यांना आपल्या मनोगतातून करुन दिली. त्यानंतर प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले धनंजय वानखडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनातून सावित्रीबाईंनी केलेल्या सामाजिक कार्याची माहिती दिली. शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष विनोद मुगल यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना सावित्रीबाईंनी केलेल्या शैक्षणिक कार्याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन वृषाली दातीर आणि कल्पना भटकर यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिया चुटे हिने केले. उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला.

# वादविवादातून समाजहिताचे विचारमंथन होते!

## दिलीपबाबू इंगोले यांचे प्रतिपादन ● स्व.माणिकराव घवळे स्मृती वादविवाद स्पर्धेचे थाटात उदघाटन




### तरुणाईला सक्षम करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज - हेमंत काळमेघ

आजच्या काळात तरुणाईला योग्य दिशा देण्यासाठी तसेच त्यांच्यात विचारमंथन घडवून आणण्यासाठी अशा उपक्रमांची समाजाला गरज आहे. महाविद्यालयीन जीवनात अशाच उपक्रमांमधून पुढील जीवनात तरुणाईचे व्यक्तिमत्त्व उजळून निघते. अशा व्यासपीठातून आपले उज्वल आयुष घडविण्यासाठी विद्यार्थ्यांना दिशा मिळते. त्यामुळे माणिकराव घवळे प्रतिष्ठानचे हे आयोजन कौतुकास्पद आहे अशा शब्दात हेमंत काळमेघ यांनी देखील कौतुकाचा वर्षाव केला.

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.5 )** - राज्यस्तराव ओळख असलेल्या स्व. माणिकराव घवळे स्मृती वादविवाद स्पर्धेच्या माध्यमातून आजवर समाजातील अनेक चिंतनशील विषयांवर तरुण पिढीने गेल्या तेवीस वर्षांपासून उत्कृष्ट विचारमंथन केले आहे. समाजाच्या हितासाठी तरुण पिढीने अश्या ज्वलंत विषयांवर मंथन करून पुढे मार्गक्रमण करणे हीच अपेक्षा आयोजकांची असावी असे मला वाटते अश्या शब्दात श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेच्या आयोजनाची प्रशंसा केली.

डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय व स्व. माणिकराव घवळे स्मृती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्व.माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे थाटात उदघाटन पार पडले. यावेळी अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाला उदघाटक म्हणून श्री.शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध किडनीरोग तज्ञ डॉ.अविनाश चौधरी, प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख तसेच संयोजक प्रफुल्ल घवळे यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना दिलीपबाबू इंगोले म्हणाले की, गेल्या तेवीस वर्षातील या स्पर्धेच्या प्रवासाचा मी साक्षीदार असून यातून अनेक तरुण घडतांना मी बघितले आहे. तरुणाईचा विचार बळकट करणारी ही वैचारिक चळवळ अशीच मोठी होत राहावी अश्या शुभेच्छा त्यांनी यावेळी दिल्या.यावेळी डॉ. अविनाश चौधरी यांनी सांगितले की, समाजाच्या प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे व त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम ही वादविवाद स्पर्धा सातत्याने करत असून त्यातून अनेकदा आमच्यासारख्यांच्या मनातील प्रश्नांना देखील निश्चितपणे उत्तरे मिळतात.

प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख यांनी स्वागतपर भाषण केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक प्रफुल्ल घवळे यांनी केले. तसेच सूत्रसंचालन प्रा. रत्नाकर शिरसाठ व आभार मयूर चौधरी यांनी मानले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून पुणे येथील आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. पांडुरंग कंद, नागपूर येथील दै. लोकसत्ताचे सहसंपादक देवेश गोंडाने, बियाणी महाविद्यालयाच्या प्रा.डॉ.मृणाल महाजन व प्रसिद्ध साहित्यिक अमोल सावरकर यांनी काम पाहले तर संपूर्ण स्पर्धेचे अध्यक्ष म्हणून शिक्षणतज्ञ अतुल गायगोले यांनी धुरा सांभाळली. स्पर्धेत 70 स्पर्धकांनी सहभाग घेतला. राज्याच्या कोण्या कोपऱ्यातून आलेल्या स्पर्धकांनी आपल्या ओजस्वी वाणीने स्पर्धेत दमदार विचार मांडले. उशिरा रात्रीपर्यंत चाललेल्या या स्पर्धेला स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# चिंचोली रहिमापुर येथे वरली मटक्याला पोलिसाचे तथास्तु?

## गाव बनले अवैध धंद्यांचे माहेरघर



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.5 )**- तालुक्यातील चिंचोली रहिमापुर गाव अवैध धंदे चालकांचे माहेरघर झाले आहे. बिनदिक्कतपणे वरली मटका, चालू असल्याने गावात पोलीसांचा धाक आहे की, नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. चिंचोली रहिमापुर पोलीस स्टेशनच्या हद्दीत मागील अनेक दिवसापासून अवैध वाळूसाठी चर्चेत आला आहे. त्यातच ग्रामीण भागात अवैध धंद्याने डोके वर काढले आहे.

कहर म्हणजे रहिमापुर पोलीस स्टेशनच्या शंभर मीटर अंतरावर वरली मटका सुरू असल्याने पोलीसांच्या कार्य प्रणालीवर प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे. चिंचोली रहिमापुर पोलीस स्टेशन असलेल्या गावातच दोन अवैध रितीने वरली मटका चालक खुल्याआमपणे चिठ्ठी देऊन मटका घेत असल्याने नेमकं या अवैध धंद्यांना अभय कोणाचे मिळाले आहे, अशी चर्चा सामान्य लोक करत आहेत. अवैध दारू विक्री, सह वरली मटक्याला पेव फुटलं आहे. घरातील लहान मुलांपासून मोठ्या व्यक्ती या वरली मटका व व्यसनांच्या आहारी जात असल्याने गावागावात कलह व सामान्य लोकांचे कुटुंब उध्वस्त होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. चिंचोली रहिमापुर पोलीस स्टेशन अंतर्गत गावांमध्ये

पान टपरी व चौकामध्ये सर्रासपणे चिठ्ठी देऊन मटका जुगार चालू असल्याचे चित्र दिसत आहे.

ग्रामीण भागामध्ये हे चित्र पाहायला मिळत आहे. प्रतिबंधित असणारा गुटखा ही किराणा दुकानांमध्ये उपलब्ध झाला असुन याचे व्यसनही लहान शाळकरी मुलांपर्यंत पोहोचले आहे. पोलीस प्रशासनाची वचक अवैध धंदे चालकावर राहिली नसल्याने ते बिनदिक्कत हा व्यवसाय चालवत असल्याचे चित्र असून प्रशासनाने वेळीच या गंभीर बाबीकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.